**मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, मु. पो. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता १२००० मेट्रीक टन प्रतिदिन वरुन १६००० मेट्रीक टन प्रतिदिन करणे या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाकरिता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, मु.पो. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता १२००० टीसीडी वरुन १६००० टीसीडी करणे या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दि. १२-१२-२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता कारखाना कार्यस्थळावर घेण्यात आली.

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते :-

१. मा. श्री. भाऊसाहेब गलांडे - अध्यक्ष
अपर जिल्हा दंडाधिकारी, कोल्हापूर
(मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी)

२. श्री. रविंद्र आंधळे - सदस्य
प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर
(म.प्र.नि. मंडळाचे प्रतिनिधी)

३. श्री. प्रशांत गायकवाड,
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, - समन्वयक
कोल्हापूर.

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

सर्वप्रथम श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा जनसुनावणीचे समन्वयक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी सांगितले की, भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ व त्यातील सुधारणा अन्वये प्रस्तावित प्रकल्प 'अ' प्रवर्गामध्ये येत असल्याने आजची जनसुनावणी घेण्यात येत आहे. यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला होता. त्यांना भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय यांनी काही अटी व शर्ती घालून टी.ओ.आर. मंजूर केलेला आहे व प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केलेला आहे. त्यानंतर मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी सदर जनसुनावणी घेण्यास मान्यता दिली व त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०८-११-२०१९ रोजीच्या दै. "पुढारी" या मराठी व "टाईम्स ऑफ इंडिया" या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये

प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना प्रसिध्द केलेली होती. प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेला प्रारुप पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर; जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर; जिल्हा परिषद, कोल्हापूर, मा. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय, मुंबई; प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ कोल्हापूर; प्रांत अधिकारी कार्यालय करवीर विभाग; प्रांत अधिकारी कार्यालय इचलकरंजी विभाग; तहसिल कार्यालय, हातकणंगले; गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, हातकणंगले; हुपरी नगरपरिषद, हुपरी; ग्रामपंचायत कार्यालय, यळगूड, ता. हातकणंगले इ. ठिकाणी जनतेच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या व जनतेकडून प्रस्तावित प्रकल्पाबाबत हरकती, आक्षेप सूचना मागविण्यात आलेल्या होत्या. तद्नंतर आज अखेर प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात म.प्र.नि. मंडळाकडे एकही तक्रार, हरकत, अनुमोदन प्राप्त झालेले नाही. प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनतेच्या सूचना, टिका, प्रश्न असतील तर आपण लेखी किंवा तोंडी स्वरुपात मांडाव्यात त्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेतली जाईल. ही पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती केवळ जनतेच्या पर्यावरण विषयक तक्रारी, सूचना यांची नोंद घेणार असून प्रकल्प उभारणीबाबत कोणताही निर्णय ही समिती घेणार नाही. या जनसुनावणीचा उद्देश जनतेस प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या ऊपाययोजना तसेच जनतेच्या टिका, सूचनांची नोंद घेवून त्याचे इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांचेकडे पुढील निर्णय घेणेसाठी सादर करणे हा आहे असे सांगून श्री. प्रशांत गायकवाड यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती सादर करण्याची सूचना केली.

यानंतर प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार डॉ. संग्राम घुगरे, मे. इक्विनॉक्स एन्व्हायरनमेंट्स (इं.) प्रा. लि. यांनी स्लाईड शोव्दारे प्रस्तावित प्रकल्पांबाबत माहिती सादर केली. त्यांनी सांगितले की, मे. जवाहर शेतकरी स.सा.का. मर्यादित ची स्थापना १९९० मध्ये झाली व सुरवातीस या प्रकल्पाची गाळप क्षमता ०१ मेट्रीक टन प्रतिदिन इतकी होती. साखर कारखाना हा 'ब' प्रवर्गामध्ये येत असल्याने तो राज्य सरकारच्या नियंत्रणामध्ये येतो. पण मे. जवाहर शेतकरी स.सा.का. मर्यादित हा प्रकल्प महाराष्ट्र - कर्नाटक या आंतरराज्य सिमेच्या २.३५ किमी अंतरावर येतो त्यामुळे दोन्ही राज्यातील ऊस या कारखान्यामध्ये गाळप केला जाऊ शकतो व त्यामुळे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय यांच्या नोटीफिकेशन मधील एका अटीनुसार कोणताही प्रकल्प स्थळ जर आंतरराज्य सिमेपासून ०५ किमीच्या आंत असेल तर त्याचा समावेश 'अ' प्रवर्गामध्ये केला जातो व सदरील प्रकल्प केंद्र शासनाअंतर्गत येतो. असे असल्याने मे. जवाहर शेतकरी स.सा.का. मर्यादित या प्रकल्पाचा समावेश 'अ' प्रवर्गामाध्ये करण्यात आलेला आहे असे सांगून डॉ. घुगरे यांनी प्रस्तावित प्रकल्पाची पार्श्वभूमी, प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रकल्पाचे स्थान व पर्यावरणीय संरचना, एकत्रीत प्रकल्पाची माहिती, विस्तारीकरण प्रकल्पाची वैशिष्टये, प्रकल्प प्रवर्तक तपशिल, प्रकल्प विस्तारीकरणाची गरज, उल्लेखनीय कामगिरी आणि पुरस्कार, उत्पादने आणि जोड उत्पादने, कच्चा माल, साखर व सहवीज उत्पादन प्रक्रिया, साखर कारखाना व सहवीज प्रकल्पांसाठी पाण्याचा वापर, साखर कारखाना व सहवीज प्रकल्पांतून निघणारे घरगूती व औद्योगिक सांडपाणी, साखर कारखाना औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व त्याचे फोटोग्राफ, प्रदूषणाचे स्त्रोत, आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा, हरितपट्टा विकास कार्यक्रम, सामाजिक व आर्थिक विकासाअंतर्गत केलेला खर्च, नियोजित सामाजिक व आर्थिक विकास, प्रकल्पामधील पर्यावरणीय घटकांसाठीचा गुंतवणूक तपशिल, पर्यावरणविषयक तपासणी कार्यक्रम, सॅटेलाईट इमेज, जैव विविधता, हॅबीटॅट इ. बाबत माहिती सादर केली.

वरील सादरीकरणानंतर नागरीकांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत प्रस्तावित प्रकल्पाचे व्यवस्थापन / पर्यावरण विषयक सल्लागार यांनी खालीलप्रमाणे उत्तरे दिली / म्हणणे मांडले.

**प्रश्न क्र. १. श्री. दादासो व्यंकटराव खानविलकर, गाँव रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल कोठून उपलब्ध करणार ?

**उत्तर -**

श्री. मनोहर जोशी, व्यवस्थापकीय संचालक, मे. जवाहर शेतकरी स.सा.का. मर्यादित यांनी सांगितले की, सध्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांचा ऊस गाळपासाठी येतो. यावर्षी २४००० हेक्टर क्षेत्रातून ऊस गाळपासाठी आलेला आहे अशी नोंद आहे आणि सर्व सभासदांच्या ऊसावर अवलंबून असणारा हा कारखाना आहे. विस्तारीत प्रकल्पासाठी सुध्दा कारखान्याच्या कार्यक्षेत्रातीलच ऊस घेतला जाईल व त्यासाठी कार्यक्षेत्राबाहेरील ऊस घेण्याची आवश्यकता नाही.

**प्रश्न क्र. २. श्री. सुजीत धोंडीराम शिंदे, गाव रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्पातून किती साखर निर्मिती होणार ?

**उत्तर -**

श्री. जोशी यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पातून १०० दिवसामध्ये १६ लाख टन साखर गाळप होईल व जर १६० दिवस कारखाना चालला तर २५ लाख टनापर्यंत साखरेचे गाळप होईल. सध्या कारखान्याचा ऊतारा साधारणत: पावणे तेरा टक्के पर्यंत पाहोचलेला आहे. आज अखेर २२ लाख टन साखरेचे उत्पादन झालेले आहे. १३ टक्के पर्यंत ऊतारा मिळवण्याचे कारखान्याचे नियोजन आहे. त्यामुळे वाढीव क्षमतेचा विचार केला तर १३ टक्के ऊतारानुसार १६० दिवसांमध्ये ३० ते ३२ लाख टन साखर उत्पादन करण्याची क्षमता निर्माण होईल.

**प्रश्न क्र. ३. श्री. सुरेश आमगोंडा भोजकर.**

कारखान्याने आपले कार्यक्षेत्र व परिसरामध्ये वृक्ष लागवडीची काय योजना आखलेली आहे ?

**उत्तर -**

श्री. जोशी यांनी सांगितले की, सध्या कारखान्याचे १०० हेक्टर इतके कार्यक्षेत्र आहे. यामध्ये ३४.५ टक्के क्षेत्रावर वृक्ष लागवड केलेली आहे. आपण ते सॅटेलाईटवरुन बघू शकता. या

व्यतिरिक्त जी जमीन शिल्लक आहे त्यामध्ये चार ते पाच टक्के क्षेत्रावर विस्तारीकरणानंतर वृक्ष लागवड करण्याचे नियोजन आहे.

**प्रश्न क्र. ४. श्री. विजय एकनाथ जोशी, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**

विस्तारीकरणानंतर कोणकोणती उप उत्पादने (बाय प्रॉडक्टस) निर्माण होतील ?

**उत्तर -**

श्री. जोशी यांनी सांगितले की, सध्या आपल्या कारखान्यामध्ये २७ मेगावॅट विजनिर्मिती होते. त्यातील १२ ते १४ मेगावॅट इतकी विज स्वत: कारखान्यासाठी वापरले जाते व राहिलेली विज राज्य विज मंडळास विकली जाते. या व्यतिरिक्त आपल्याकडे बगॅस व मोलॅसिस यांची निर्मीती होते. बाजारामध्ये मोलॅसिस चांगल्या भावाने विकले जाते. मोलॅसिसचा दर्जा चांगला रहावा यासाठी अतिरिक्त स्टोरेज टँक बांधण्याचे नियोजन आहे. आपल्या सभोवती टेक्स्टाईल उद्योग मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे स्थानिक बाजारपेठेमध्ये बगॅसला सुध्दा चांगली मागणी आहे. कारखान्यामध्ये तयार होणारा बगॅससुध्दा चांगल्या प्रतिचा असल्यामुळे कागल पंचतारांकीत औद्योगिक वसाहत तसेच इचलकरंजी येथील टेक्स्टाईल प्रोसेसिंग उद्योगांचे बॉयलर आमच्या साखर कारखान्याच्या बगॅसवर उत्तमप्रकारे चालू आहेत व त्याला स्थानिक बाजारपेठामध्ये चांगली मागणी आहे.

**प्रश्न क्र. ५. श्री. आप्पासाहेब पाटील, गाव पट्टणकोडोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

सहवीज प्रकल्प किती दिवस कार्यरत राहणार ?

**उत्तर —**

श्री. जोशी यांनी सांगितले की, सहविज निर्मिती प्रकल्पामध्ये बॅक प्रेशर टर्बाईन व कंडेन्सींग टर्बाईन असे दोन प्रकार असतात. सन १९९४ मध्ये कारखाना व्यवस्थापनाने १.५ मेगावॅट क्षमतेचा बॅक प्रेशर टर्बाईन विज निर्मितीचा प्रकल्प केला. सन २००० साली २० मेगावॅट क्षमतेचा बॅक प्रेशर टर्बाईन विज निर्मितीचा प्रकल्प केला. त्यानंतर २००७ साली ३ मेगावॅटने क्षमता वाढविली तो सुध्दा बॅक प्रेशर टर्बाईन विज निर्मितीचा प्रकल्प केला. बॅक प्रेशर टर्बाईन असा फायदा आहे की, आपण निर्माण झालेल्या विजेचा आपणांसाठी वापर केल्यानंतर राहिलेली विज राज्य विद्युत मंडळास विकतो. शिल्लक राहिलेला बगॅस सुध्दा बाजारपेठेमध्ये खपतो. विस्तारीकरणानंतर विजेचा अंतर्गत वापर कमी होईल व जी जादा विज राहील ती विद्युत मंडळाला विकली जाईल.

**प्रश्न क्र. ६. श्री. हारुण सरदार मुजावर, गाव रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्पासाठी अंदाजे किती खर्च येईल ?

**उत्तर -**

श्री. जोशी यांनी ऊस गाळप १२००० मेट्रीक टन प्रतिदिन पासून १६००० मेट्रीक टन प्रतिदिन करण्यासाठी साधारणत: ३४ कोटी रुपये इतका अत्यंत कमी भांडवली खर्च येईल असे सांगितले.

**प्रश्न क्र. ७. श्री. वामन भास्कर कांबळे, राहणार रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

साखर कारखान्याच्या आजुबाजुला असणा-या रेंदाळ, हुपरी, यळगूड, रांगोळी व जंगमवाडी या गावांना प्रस्तावित प्रकल्पाचा काय फायदा होईल ?

उत्तर –

श्री. जोशी यांनी सांगितले की, हा प्रकल्प रेंदाळ, हुपरी आणि यळगूड या तीन गावांच्या वेशीवर उभारलेला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे स्थानिक रोजगार या तीन गावांमध्ये जास्तीतजास्त निर्माण झालेला आहे व येथून पुढे देखील निर्माण होईल. कारखान्यातून निघणा-या सांडपाण्यावर चांगल्या प्रकारची प्रक्रिया करुन ते पाणी जंगमवाडी या गावातील १०० एकर जमिनींना ऊसासाठी दिले जाते. या गावामध्ये कधीच नदीचे पाणी येवू शकले नसते अशा ठिकाणी १०० एकर जमिनीवर ऊसासाठी पाणी आम्ही दिलेले आहे. त्यामध्ये थोडी वाढ होऊ शकेल. जर कारखान्याची भौगोलिक परिस्थिती विचारात घेतली तर स्थानिक रोजगार निर्मिती, कुटीरोद्योगाला चालना, उद्योगामध्ये वाढ अशी मोठी बाजारपेठ कारखान्याने उपलब्ध करुन दिलेली आहे व तेथे चांगली आर्थिक उलाढाल होते तसेच प्रदूषण निर्मिती अत्यल्प असल्यामुळे त्याचा आतापर्यंत कोणालाही त्रास झालेला नाही.

**प्रश्न क्र. ८. श्री. आप्पासाहेब पाटील, राहणार यळगूड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्पातून कोणकोणत्या प्रकारचे दुषीत पाणी निर्माण होणार आहे आणि त्याचे प्रमाण काय असणार आहे ?

उत्तर –

श्री. जोशी यांनी सांगितले की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या मानकांप्रमाणे एक टन ऊस गाळपातून २०० लिटर सांडपाणी निर्मिती करता येते. आपल्या कारखान्यामध्ये सध्या एक टन ऊस गाळपातून ९३ लिटर सांडपाणी निर्मिती होते व विस्तारीकरणानंतर हे प्रमाण ८७ ते ८५ लिटर पर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. या पाण्याचा वृक्ष लागवडीसाठी वापर केला जातो व सभासदांच्या मागणीनुसार जंगमवाडी येथील १०० ते १२५ एकर ऊसासाठी दिले जाते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच मानकांचे आम्ही तंतोतंत पालन केलेले आहे.

**प्रश्न क्र. ९. श्री. सनतकुमार पायगोंडा भोजकर, गाव तळंदगे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आजच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीबाबत दिलेली सूचना वाचून आम्ही आज येथे उपस्थित राहिलो आहे. सादरीकरणादरम्यान बरीच माहिती

दिलेली आहे पण सर्वांत महत्वाचे म्हणजे प्रकल्पातून निर्माण होणारे सांडपाणी, हवा प्रदूषण, आवाज यांची कारखाना वेळोवेळी तपासणी करते काय ? येथून पुढे करणार आहे काय व जर करणार असाल तर कोणत्या एजन्सीमार्फत तपासणी करणार ?

उत्तर -

श्री. जोशी यांनी सांगितले की, कारखान्याचे सांडपाणी आम्ही बाहेर पाठवत नाही व जे निर्माण होते त्यावर प्रक्रिया करुन ते शक्यतो कारखान्याने वनराई केलेली आहे त्यासाठी वापरले जाते. कारखाना कार्यस्थळामध्ये दोन बंधारे बांधलेले आहेत त्यामध्ये पावसाचे पाणी साठवले जाते. कारखान्यामध्ये जो प्रत्येक शिफ्टचा भोंगा वाजतो तेवढा आवाज निर्माण होतो व कुठल्याही प्रकारचा आवाज कारखाना परिसराबाहेर जात नाही. धुलीकण जर यंत्रणेमध्ये बिघाड झाला तरच निर्माण होतात. जी राख निर्माण होते तिचा खत म्हणून वापर केला जातो. शेजारील गावांतील नागरिकांना कुठल्याही प्रकारचा हवा प्रदूषण, जल प्रदूषण, आवाज यांचा त्रास होऊ नये याची पूर्ण खबरदारी घेतलेली आहे व याची तपासणी करण्यासाठी बाहेरच्या स्वतंत्र एजन्सी नेमलेल्या आहेत व त्यांचा तपासणी अहवाल शासनाकडे सादर केला जातो.

**प्रश्न क्र. १०. श्री. आनंदा धोंडीबा माळी, यळगूड, ता हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

कारखान्याच्या विस्तारीकरणाबद्दल सर्वप्रथम मी संचालक मंडळाचे अभिनंदन करुन आभार मानतो. प्रकल्पाचे विस्तारीकरण करत असताना आपण कोणत्या प्रदूषण नियंत्रण उपकरणांचा वापर करणार आहात ?

उत्तर -

श्री. जोशी यांनी सांगितले की, हवा प्रदूषण, जल प्रदूषण यांचे प्रत्येक सेकंदाला मोजमाप केले जाते. म.प्र.नि. मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडून ऑनलाईन मॉनिटरींग केले जाते व मर्यादेपेक्षा अधिक आढळून आल्यास तात्काळ समजते. ही यंत्रणा अद्यावत असून गेली चार वर्षे कारखान्यामध्ये कार्यान्वित आहे.

डॉ. घुगरे यांनी सांगितले की, प्रकल्पाला जो पर्यावरण विषयक परवाना मिळालेला आहे व पुढे मिळणार आहे त्यामध्ये काही अटी घातलेल्या असतात व त्या अटींचे पालन केल्याबाबतचा अहवाल दर सहा महिन्याला वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नागपूर कार्यालय यांना सादर करावा लागतो. त्यानंतर त्यांचे अधिकारी कारखान्यास भेट देतात तसेच म.प्र.नि. मंडळाच्या अधिका-यांकडून महिन्यातून दोनदा पाहणी केली जाते. त्याशिवाय केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी कोणतीही सूचना न देता भेट देऊन कारखान्याची पाहणी करतात व त्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणा योग्यरित्या चालविल्या जातात का नाही याच्या सर्व नोंदी तपासल्या जातात.

**प्रश्न क्र. ११. श्री. धनंजय गोपाळ मगदूम, गाव पट्टणकोडोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होतील का ?

उत्तर -

श्री. जोशी यांनी सांगितले की, आपल्या कारखाना परिसरामध्ये असणारी वृक्ष लागवडीमुळे ऑक्सिजनचे प्रमाण चांगले आहे त्यामुळे कारखान्यातील कामगारांचे आरोग्य चांगले आहे. शेजारील गावांमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रदूषणाचा त्रास होत नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही व येथून पुढेही निर्माण होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे.

डॉ. घुगरे यांनी सांगितले की, आमच्या सोशल सायंटिस्टनी अभ्यास क्षेत्रातील गावांतील लोकांचे वयोगटानुसार रँडम सँपल केलेले असून जी माहिती संकलीत केलेली आहे त्यानुसार असे आढळले की, या भागातील लोकांच्या आरोग्याचा इंडेक्स हा ७० ते ७२ टक्के आहे म्हणजे या भागातील लोकांचे चांगले आरोग्य आहे. परंतु प्रदूषणास केवळ कारखाना जबाबदार नसतो, आजुबाजुचे घटक जसे नदी प्रदूषण, मैला मिश्रीत पाणी इ. घटकसुध्दा जबाबदार असतात.

<u>प्रश्न क्र. १२. श्री. वसंत महादेव घाटगे, गाव जंगमवाडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.</u>

प्रस्तावित प्रकल्पासाठी किती लिटर पाणी लागेल व ते कोठून उपलब्ध केले जाईल ?

<u>उत्तर</u> -

डॉ. घुगरे यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पासाठी ऊसातील पाणी वापरले जाईल. नदीचे पाणी एका टनाला १०० लिटर इतके लागेल व त्यास पाटबंधारे खात्याने परवानगी दिलेली आहे व त्यांनी दिलेल्या परवानगीच्या जवळपास ६० ते ७० टक्के पाणी आम्ही कमी वापरतो.

<u>प्रश्न क्र. १३. श्री. अनिल चौगुले, जिल्हा पर्यावरण समिती सदस्य, कोल्हापूर, जि. कोल्हापूर.</u>

सादरीकरणादरम्यान एका स्लाईडमध्ये घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र व औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र असा उल्लेख होता त्याबाबत विश्लेषण करावे. सध्या जे घरगुती सांडपाणी निर्माण होते त्यावर प्रक्रिया करण्यासाठी घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारले आहे काय ?

<u>उत्तर</u> -

डॉ. घुगरे यांनी सांगितले की, कारखान्यातील कामगार आणि ज्या वसाहती आहेत त्यामधून जे घरगुती सांडपाणी निर्माण होईल त्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया केली जाईल व औद्योगिक सांडपाण्यावर औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेले सांडपाणी झाडांसाठी वापरण्यात येईल. सद्यस्थितीत घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारलेले नाही. वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाच्या अटीनुसार घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र प्रस्तावित आहे.

<u>प्रश्न क्र. १४. श्री. विजय पाटील, गाव यळगूड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.</u>

वाढीव उत्पादनामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार का ?

<u>उत्तर</u> -

श्री. जोशी यांनी सांगितले की, विस्तारीकरणासाठी ३४ कोटी रुपये भांडवली खर्च येणार आहे आणि विस्तारीकरणामुळे अतिरिक्त ९९ रोजगार निर्माण होतील.

**प्रश्न क्र. १५. श्री. चंद्रकांत मारुती वड्ड, ग्रामपंचायत सदस्य.**

प्रस्तावित प्रकल्पातून किती वीज निर्मिती केली जाणार आहे ?

उत्तर -

श्री. जोशी यांनी सध्या २७ मेगावॅट वीज निर्मिती होते, एकूण प्रकल्पास १४ ते १५ मेगावॅट वीज लागेल व शिल्लक राहिलेली वीज महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास पाठविली जाईल असे सांगितले.

**प्रश्न क्र. १६. श्री. सुभाष आण्णासो गोटखिंडे, माजी सरपंच, ग्रामपंचायत यळगूड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

कारखान्याच्या दक्षिणेला कंपाऊंडला लागून माझी शेती आहे. माझ्या शेतात ऊस व भाजीपाला पिकतात. मी कारखाना व्यवस्थापनाचे मनापासून आभार मानतो की गेली २७ वर्षे हा साखर कारखाना कार्यरत आहे व १२००० वरुन १६००० मेट्रीक टन साखरेचे उत्पादन होणार आहे. माझी सूचना आहे की, १६००० ऐवजी २०००० मेट्रीक टन साखरेचे उत्पादन झाले असते तर ९० दिवसामध्ये कारखान्याचा गाळप हंगाम झाला असता व ओव्हरहेड कमी झाले असते व माझ्यासारख्या शेतक-याचा ऊस गाळपास आला असता त्यामुळे उन्हाळी सोयाबीन, भुईमुंग या सारखे पिक घेता आले असते. माझी दुसरी सूचना आहे की, कारखाना संपूर्ण यळगूड गावच्या हद्दीमध्ये असल्याने सी.एस.आर. अंतर्गत तसेच नवीन उपलब्ध होणा-या रोजगारामध्ये यळगूड गावाला झुकते माप मिळावे. माझ्या सूचनांची दखल घ्यावी.

उत्तर -

श्री. जोशी यांनी सूचना स्वागतार्ह आहे असे सांगून आतापर्यंतचे विस्तारीकरण टप्प्याटप्प्याने आर्थीक फलश्रुती काय आहे हे पाहून केलेले आहे, १२००० पासून १६००० मेट्रीक टन प्रतिदिन हा टप्पा पूर्ण झाल्यानंतर येथूनपुढे वाढणारे ऊस क्षेत्र काय आहे याचा अंदाज घेऊन व्यवस्थापनापुढे योग्यतो प्रस्ताव मांडला जाईल आणि व्यवस्थापनाच्या मान्यतेनंतर याबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी दाखल केला जाईल असे सांगितले. सी.एस.आर. आणि रोजगार याबाबत सांगायचे तर जंगमवाडी, यळगूड, हुपरी, रेंदाळ आणि तळंदगे या गावांना आतापर्यंत झुकते माप राहिले आहे व यापुढेही या गावांना प्राधान्य राहील.

**प्रश्न क्र. १७. श्री. कुबेर पाटील, गाव यळगूड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

कारखान्याच्या विस्तारीकरणास माझ्या शुभेच्छा आहेत. माझी सूचना आहे की, कारखाना स्थापनेपासून आजपर्यंत जे रस्ते पुर्वी होते तसेच आज आहेत. शासनाने व कारखान्याने रस्ते विस्तारीकरण करावे, पुर्वी वाहतूक कमी होती विस्तारीकरणामुळे वाढ झालेली आहे, त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील गावांना त्रास कमी होईल याचा कारखाना व्यवस्थापनाने विचार करावा.

<u>उत्तर</u> -

श्री. जोशी यांनी सूचना स्वागतार्ह आहे असे सांगून कारखान्याकडे येणारी जाणारी वाहने असल्याने लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालय, राज्य शासनाने याची दखल घेऊन रस्त्यांचे रुंदीकरण कांही ठिकाणी डांबरीकरण हाती घेतलेले आहे व यापुढेही शासन दरबारी कारखाना व्यवस्थापनामार्फत याबाबत पाठपुरावा केला जाईल.

**<u>प्रश्न क्र. १८. श्री. विलास खानविलकर, माजी जिल्हापरिषद सदस्य, राहणार रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर</u>.**

साखर कारखान्याचे विस्तारीकरण होणार आहे. या परिसरात, तेरा गावांच्या कमांड एरियाचा विचार केला तर कारखान्याचे विस्तारीकरण होणे गरजेचे आहे. २५०० मेट्रीक टन प्रतिदिन पासून १२००० मेट्रीक टन प्रतिदिन कारखान्याचे विस्तारीकरण होत असतानादेखील पर्यावरण व प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झालेला होता. कारखाना सुरु झाल्यापासूनच कारखान्याचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांनी पर्यावरण व प्रदूषणाची काळजी घेतलेली होती. कारखाना उभा करण्यापुर्वी झाडे लावलेली होती. ज्यावेळी कारखान्याचे १२००० मेट्रीक टन प्रतिदिन इतके विस्तारीकरण झाले त्यावेळी आम्ही म्हणत होतो की, चिमणीवाटे निघणारे धूर व राख यामुळे प्रदूषण होऊन रोगराई होईल किंवा कारखान्याचे सांडपाणी बाहेर सोडल्यामुळे प्रदूषण होईल. पण कारखान्याने सांडपाणी बाहेर सोडले नाही व जंगमवाडी येथे १०० एकर ऊसासाठी दिले तेथे नदीचे पाणी येत नाही तसेच भुईमुंग, शाळू या व्यतिरिक्त कोणतेही पिक जेथे येत नव्हते तेथे १०० एकर ऊस कारखान्याच्या पाण्यावर अवलंबून आहे. श्री. गोटखिंडे, माजी सरपंच यांच्या मताशी मी सहमत आहे, कारखाना १६००० ऐवजी २०००० मेट्रीक टन क्षमतेचा झाला असता तर या भागाचे चांगले झाले असते. आताची परिस्थिती बघितली तर विस्तारीकरणाची गरज आहे त्यामुळे त्यास मंजुरी द्यावी.

**<u>प्रश्न क्र. १९. सरपंच, ग्रामपंचायत तळंदगे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर</u>.**

आमचे गाव ७ किमी अंतरावर आहे. आमच्या गावाला कारखान्यापासून कोणताही त्रास नाही. सी.एस.आर. मधून आमच्या गावालासुध्दा सहकार्य करावे ही विनंती.

<u>उत्तर</u> -

श्री. जोशी यांनी सूचना स्वागतार्ह आहे असे सांगून तळंदगे गावामध्ये कारखाना ठिबक सिंचन फुल ॲटोमेशन योजना राबवत आहे व यापुढेही अशा काही योजना आल्या तर त्या योजना या चार पाच गावामध्ये राबविण्यात येतील असे सांगितले.

**<u>प्रश्न क्र. २०. सौ. शालन रावसाहेब पाटील, सरपंच, ग्रामपंचायत इंगळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर</u>.**

कारखान्यापासून आमचे गाव जवळच आहे, आमच्या गावाला कारखान्यापासून कुठल्याही बाबतील त्रास नाही. या कारखान्यामध्ये आमच्या गावचे भरपूर मजूर काम करतात. आमची कारखान्याबाबत कोणतीही तक्रार नाही.

वरील चर्चेनंतर जनसुनावणीचे अध्यक्ष मा. श्री. भाऊसाहेब गलांडे यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या नियमांनुसार साखर कारखान्याचे विस्तारीकरणाबाबतच्या प्रक्रियेनुसार ही जनसुनावणी घेण्यात येत आहे. त्यासाठी आज आपण सर्वजन उपस्थित राहून आपली मते मांडली. आपण जे मत व्यक्त केलेले आहे त्याची जनसुनावणी समितीमार्फत जशीच्या तशी नोंद घेण्यात आलेली असून जनसुनावणीचे इतिवृत्त केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रीलयास सादर केले जाईल.

यानंतर मा. अध्यक्षांनी सर्व नागरीकांनी जनसुनावणीमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला व शांततेमध्ये आपली मते मांडून पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी पार पाडण्यासाठी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे व इतर सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणी संपल्याचे घोषीत केले.

| | | |
|---|---|---|
| (प्रशांत गायकवाड) | (रविंद्र आंधळे) | (भाऊसाहेब गलांडे) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, | अपर जिल्हा दंडाधिकारी |
| म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर | म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर | कोल्हापूर |